आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१४ एप्रिल २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना १३४ व्या जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन
- गुजरातजवळ अरबी समुद्रातून अठराशे कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त
- फरार हिरे व्यापारी मेहुल चोकसीला बेल्जियममध्ये अटक

**आणि**

- सहा महिलांचं पथक ब्लू ओरिजिन रॉकेटच्या माध्यमातून पृथ्वीच्या वातावरणात प्रवास करण्यासाठी रवाना

**<><><><><><>**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी आज देशभरात साजरी होत आहे. बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त त्यांना देशभरात अभिवादन केलं जातं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जयंतीनिमित्त बाबासाहेबांना अभिवादन केलं.

जीवनातल्या असंख्य अडचणींवर मात करून बाबासाहेबांनी स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आणि आपल्या कर्तृत्वामुळे जगभरात आदराचं स्थान प्राप्त केलं, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

बाबासाहेबांच्या प्रेरणेमुळेच आज देश सामाजिक न्यायाचं स्वप्न साकार करू शकतोय. बाबासाहेबांची तत्वं, त्यांचे आदर्श, स्वावलंबी आणि विकसित भारताच्या निर्मितीला बळ आणि गती देतील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या संदेशात म्हणाले.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, राज्यसभेतले सभागृह नेते जे. पी. नड्डा, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसद भवन संकुलातल्या आंबेडकर यांच्या पुतळ्याला आज अभिवादन केलं.

<><><><><><>

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी  मुंबईच्या चैत्यभूमीवर राजकीय नेत्यांसह भीम अनुयायी पहाटेपासून जमा झाले आहेत.  राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि इतर मंत्र्यांनी देखील चैत्यभूमीला भेट देऊन आंबेडकरांना अभिवादन केलं.

जातीयवाद हा अभिशाप असून विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी आंबेडकरांना अभिप्रेत जातीविरहित समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, असं प्रतिपादन राज्यपालांनी केलं. छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमणापासून देशाला वाचविलं तर बाबासाहेबांनी समतेसाठी आपलं जीवन वेचलं असं राज्यपाल म्हणाले.

संविधानाच्या माध्यमातून देशाची एकता आणि अखंडता कायम ठेवण्याचं अमूल्य कार्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलं आहे. आज आपण जो एकसंघ भारताचा अनुभव घेत आहोत, त्याचा आधारस्तंभ संविधान हेच आहे, असं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड-मुख्यमंत्री बाइट..**

**<><><><><><>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं.

रत्नागिरी जिल्ह्यात मंडणगड तालुक्यातल्या आंबडवे या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ गावीही आज त्यांची जयंती साजरी करण्यात आली. जगभरातून अभ्यासक आणि पर्यटक येतील असं भव्यदिव्य स्मारक आंबडवे गावी उभारलं जाईल, हे स्मारक बाबासाहेबांच्या विचारांचं म्हणजेच ज्ञानस्मारक असेल, अशी घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी यावेळी केली.

नागपूरमध्ये बुद्ध विहारांमध्ये वंदना आणि अभिवादनाचे कार्यक्रम होत आहेत. दीक्षाभूमी तसंच संविधान चौकातही अभिवादनासाठी भीम अनुयायांच्या रांगा लागल्या आहेत. नागपुरातल्या अनेक भागात मोटार सायकल रॅली काढण्यात आली असून त्यात शेकडो अनुयायी सहभागी झाले आहेत.

**<><><><><><>**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आमच्या सरकारला मार्गदर्शनपर ठरत असून त्यांच्या आदर्शांनुसारच हे सरकार गेल्या ११ वर्षांपासून काम करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. ते हरियाणाच्या हिसार इथं आयोजित सभेत बोलत होते.

**होल्ड - प्रधानमंत्री….**

समाजातील शोषित वर्गापासून ते वंचितांपर्यंत, आदिवासींपासून महिला वर्गापर्यंत सर्वांच्या आयुष्यात बदल करण्यासाठी, त्यांच्या इच्छा-अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपलं सरकार प्रयत्नशील असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं. बाबासाहेबांची जयंती दलित, वंचित आणि मागास वर्ग दिवाळीसारखी साजरा करत असल्याचंही प्रधानमंत्री म्हणाले.

वक्फ कायद्यात बदल केल्याचा फायदा गरीब मुस्लिमांना होणार आहे. तसंच आदिवासींच्या जमिनींचंही यामुळे संरक्षण होणार आहे. वक्फ कायद्यात बदल झाल्यानंतर अनेक मुस्लिम विधवा महिलांनी सरकारला पत्र पाठवून आभार मानल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं. या सभेच्या आधी प्रधानमंत्री मोदी यांनी हिसार विमानतळाच्या टर्मिनल दोनची पायाभरणी केली. तसंच त्यांच्या हस्ते अयोध्येसाठी व्यावसायिक विमानांचं उड्डाणाचा शुभारंभ झाला. विमानतळाच्या नवीन टर्मिनल्सच्या उभारणीसाठी ४१० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून अत्याधुनिक सुविधा इथं देण्यात येणार आहे. प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते अनेक विकास योजनांचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली.

**<><><><><><>**

अरबी समुद्राजवळ भारतीय सागरी सीमेजवळ गुजरात दहशतवाविरोधी पथक आणि भारतीय तटरक्षक दलाने काल पहाटे केलेल्या कारवाईत १ हजार ८०० कोटी रुपये किमतीचे ३०० किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले. मुद्देमाल गुजरात एटीएसकडे सोपवण्यात आला असून एटीएस या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यानी या कारवाईबाबत भारतीय तटरक्षक दल आणि गुजरात पोलिसांचं अभिनंदन केलं आहे. सरकार अमली पदार्थांच्या व्यापाराचं जाळं मूळापासून उखडून टाकत आहे. अमली पदार्थमुक्त भारत करण्याच्या दिशेने हे एक महत्वाचं पाऊल असल्याचं ते शहा समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे म्हणाले.

महसूल गुप्तचर संचालनालयाने मिझोराममधे ५२ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे ५२ किलो अमली पदार्थ जप्त केले आहेत. या कारवाईत दोघा जणांना अटक करण्यात आली आहे.

**<><><><><><>**

सीबीआयच्या विनंतीवरुन फरार हिरे व्यापारी मेहुल चोकसी याला बेल्जियम पोलिसांनी शनिवारी अटक केली आहे. पंजाब नॅशनल बँकेतल्या साडे १३ हजार कोटी रुपयांच्या कर्ज फसवणूक प्रकरणी त्याच्याविरोधात मुंबईतल्या न्यायालयानं अटक वॉरंट जारी केलं होतं. याप्रकरणातला दुसरा आरोपी नीरव मोदीचं लंडनमधून प्रत्यार्पण व्हायचं आहे. घोटाळा उघड होण्याच्या काही दिवस आधी, जानेवारी २०१८ मध्ये तो देशाबाहेर पळून गेला होता.

चोकसी याची अटक हे मोठं यश आहे. गरीबांचे पैसे लुटणाऱ्यांना, हे पैसे परत करावेच लागतील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यापूर्वीचं स्पष्ट केलं असल्याचं केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी म्हणाले.

**<><><><><><>**

अमेरिकेची गायिका केटी पेरी हिच्यासह सहा महिलांचं एक पथक आज ब्लू ओरिजिन या रॉकेटच्या माध्यमातून पृथ्वीच्या वातावरणाच्या वरच्या थरात

प्रवास करण्यासाठी रवाना झालं आहे. या पथकात केटी पेरीसह टीव्ही प्रेझेंटर गेल किंग, चित्रपट निर्माते केरियन फ्लिन, माजी नासा एरोस्पेस अभियंता आयशा बोवे आणि लैंगिक हिंसाचाराच्या विरोधातल्या मोहीमेच्या संस्थापक अमांडा गुयेन यांचा समावेस आहे. १९६३ मध्ये रशियन अंतराळवीर व्हॅलेंटिना तेरेशकोवा यांच्या ऐतिहासिक एकट्या उड्डाणानंतर आजच्या या मोहिमेत पहिली महिला अंतराळ पथक सहभागी होणार आहे.

**<><><><><><>**

इक्वेडोरचे विद्यमान राष्ट्रपती डॅनियल नोबोआ देशाच्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत दुसऱ्यादा विजयी झाले आहेत. नोबोआ यांना त्यांचे प्रतिस्पर्धी लुईसा गोंझालेझ यांच्याविरुद्ध ५५ पूर्णांक ८५ टक्के मते मिळाली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे जवळचे सहकारी म्हणून ओळखले जाणारे नोबोआ यांनी इक्वेडोरचा ड्रग्जविरुद्धचा लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

**//<><><><><><>//**